सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**उपविभागीय अधिकारी ( महसूल ) तथा उपविभागीय दंडाधिकारी कुडाळ**
तहसिलदार कार्यालय कुडाळ इमारत, पहिला मजला
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, पिनकोड ४१६ ५२०
दुरध्वनी क्र. ०२३६२ -२२३३२५ ईमेल - sdokudal@gmail.com

क्र. जबाबी/अंतिम रेखांकन/एसआर-०३/२०२४ दिनांक- २४.०६.२०२४

वाचलेः- ०१. श्री. उत्तम वसंत ओरोसकर वगैरे ४, रा. ओरोस बुद्रुक, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग यांचा दि. ०३.०५.२०२४ रोजीचा अर्ज.
०२. या कार्यालयाकडील आदेशक्र. जबाबी/तात्पुरते रेखांकन/एसआर-०९/२०२३, दि. १६.११.२०२३
०३. उप अधीक्षक, भूमी अभिलेख, कुडाळ यांचे कार्यालयाकडील मो.र.नं.४८८/०१.१२.२०२३
०४. मंडळ अधिकारी, ओरोस बुद्रुक, ता. कुडाळ यांचेकडील दि.२२.०५.२०२४ रोजीचा अहवाल.
०५. सहायक संचालक नगर रचना, सिंधुदुर्ग यांचेकडील पत्र जा. क्र. तात्पु. रेखां / ओरोसबुद्रुक-कुडाळ/स.नं.१५७/ससंनरसिं/२०१५, दि. १०.०८.२०२३
०६. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४१ व इमारत विषयक नियम १९६९ अनुसुचि ३ नियम ( १ ) ई भाग – २
०७. कार्यालयीन मंजूर टिपणी

आदेशः-

उपरोक्त वाचले क्र.१ अन्वये श्री. उत्तम वसंत ओरोसकर वगैरे ४, रा. ओरोस बुद्रुक, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग यांनी मौजे **ओरोस बुद्रुक**, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील स. नं.१५७, हि.नं.३८ब, क्षेत्र ००.१२.०० हे.आर, पो.ख. ०.१०.००, **एकूण ००.२२.०० हे. आर.** या मिळकतीमध्ये अंतिम रेखांकन परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

उपरोक्त वाचले क्र.२ अन्वये अर्जदार यांना उक्त मिळकतीमध्ये तात्पुरते रेखांकन परवानगी देण्यात आलेली आहे. तात्पुरत्या रेखांकन परवानगीनुसार अर्जदार यांनी उप अधीक्षक, भूमी अभिलेख, कुडाळ यांचे कार्यालयाकडून मोजणी करुन भूखंडाचे अंतिम क्षेत्र निश्चित करुन मोजणी नकाशा सादर केलेला असून, त्याप्रमाणे अंतिम रेखांकन मंजूरी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

उपरोक्त वाचले क्र. ०४ अन्वये मंडळ अधिकारी ओरोस बुद्रुक, ता. कुडाळ यांनी अहवाल सादर केलेला आहे.

वरील मुद्दे विचारात घेऊन अर्जदार यांना अंतिम रेखांकन परवानगी देण्यास हरकत नाही. सबब अर्जदार श्री. उत्तम वसंत ओरोसकर वगैरे ४, रा. ओरोस बुद्रुक,

ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग यांना खालील नमुद अटी व शर्तींना अधिन राहून वरील नमुद मिळकतीमध्ये **अंतिम रेखांकन परवानगी** देणेत येत आहे.

| गावाचे नाव / तालुका / जिल्हा | भुखंड क्रमांक | भूखंडाचे क्षेत्र ( चौ.मी.) |
|---|---|---|
| ओरोस बुद्रुक / कुडाळ / सिंधुदुर्ग | १ | ९५२.०० |
| | २ | ३५८.०० |
| | ३ | ३५८.०० |
| | ४ | ३५८.०० |
| भूखंडाखालील एकूण क्षेत्र | | २०२६.०० |
| रस्ता रुंदीकरणाखालील क्षेत्र | | १७४.०० |
| **एकूण** | | २२००.०० |

अटी व शर्ती :-

०१. उपरोक्त वाचले क्र. ०२ व ०५ मधील सर्व अटी व शर्ती परवानाधारक यांचेवर बंधनकारक राहतील.

०२. रेखांकनातील अंतर्गत रस्ते / खुले क्षेत्र वगळता प्रस्तावित उपभुखंडाचा वापर फक्त रहिवास वापरासाठीच करता येईल.

०३. अंतिम रेखांकन आदेशाप्रमाणे रस्त्याखालील क्षेत्र संबंधित स्थानिक प्राधिकरणाच्या ताब्यात दिल्यानंतर तसा स्वतंत्र ७/१२ करुन या कार्यालयाकडे सदरचे आदेश प्राप्त झालेपासून ३० दिवसांचे सादर करणेचा आहे.

०४. भविष्यात सदर मिळकतीबाबत न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास व दावा प्रलंबित असल्याचे निदर्शनास आलेस रेखांकनाचा अंतिम आदेश रद्द होईल.

०५. भविष्यात मालकी हक्काबाबत वाद निर्माण झाल्यास अर्जदार जबाबदार राहतील.

०६. रेखांकनापर्यंत पोहोच रस्ता देण्याची जबाबदारी अर्जदार / परवानाधारक यांच्यावर राहील.

०७. प्रस्तुत जमिन वन कायद्याने / वनसंज्ञेने बाधित, वतन/ ईनाम होत असल्यासही परवानगी रद्द होईल व त्याची जबाबदारी अर्जदार यांचेवर राहील.

०८. कोणत्याही भुखंडाची यापुढील उपविभागणी संबंधित प्राधिकरणाच्या मंजूरीशिवाय करता येणार नाही.

०९. रेखांकनात दर्शविलेली रस्ते व गटारे योग्य त-हेने विकसित करावयाचे आहेत. यानंतरच भूखंडात बांधकाम परवानगी अनुज्ञेय राहील.

१०. अर्जदार यांनी सदर प्रकरणी दिलेली माहिती व कागदपत्रे चुकीची किंवा खोटी आढळल्यास दिलेली परवानगी रद्द समजणेत येईल.

महसूल सहाय्यक
उपविभागीय अधिकारी कार्यालय
कुडाळ

( ऐश्वर्या काळुशे )
उपविभागीय अधिकारी
( महसूल ) कुडाळ

प्रतः

१) श्री. उत्तम वसंत ओरोसकर वगैरे ४, रा. ओरोस बुद्रुक, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग यांचकेडे मंजूर रेखाचित्रासहीत.

२) तहसीलदार कुडाळ / तलाठी ओरोस बुद्रुक, ता. कुडाळ यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

३) उप अधीक्षक, भूमी अभिलेख, कुडाळ यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.